दयानंद कला महाविद्यालयाच्या वेध - 2019 चा प्रकाशन सोहळा संपन्न



लातूर- 'वेध' 2019 चा 'खेळ व मानवी जीवन ' ह्या वार्षिकांकाचे प्रकाशन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी , सचिव मा. श्री रमेशजी बियाणी आणि मा.श्री. हरिकिशनजी मालू यांच्या शुभहस्ते दयानंद कला महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षात संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड , उपप्राचार्य (क.म.) अनिल माळी, पर्यवेक्षक प्रा. दिलीप नागरगोजे , मुख्य संपादक प्रा. बालाजी घुटे , संपादक सदस्य डॉ. रामेश्वर खंदारे, डॉ. सुभाष कदम, डॉ. शिवकुमार राऊतराव, कार्यालयीन अधिक्षक श्री. नवनाथ भालेराव, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक , प्रशासकीय कर्मचारी व गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रकाशन सोहळ्यात शै.वर्ष 2018-19 मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या बी.ए. पदवी परीक्षेत विद्यापीठात प्रथम आलेल्या कु. प्रियंका कुलकर्णी व विद्यापीठात तृतीय आलेल्या कु. यशोदा गायकवाड यांचा अनुक्रमे रू. 5000/- व रू. 3000/- रोख स्वरूपात बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.